**सन २०२५-२६ या वर्षात महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (कार्यक्रम) या योजनेंतर्गत मागणी क्रमांक झेडए-२, लेखाशिर्ष २२३० ए३४३ अंतर्गत २६-जाहीरातीवरील खर्च या उद्दिष्टाखाली निधी वितरीत करून खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक मनासो-२०२६/प्र.क्र.२५/कौशल्य-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ मार्च, २०२६

**वाचा** : १) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांकः विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२. दि. १७/०४/२०१५.
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः अर्थसं-२०२५/प्र.क्र. ४४/अर्थ-३, दि. ०७/०४/२०२५.
३) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र. मनासो-२०२५/प्र.क्र. ५३/कौशल्य-२, दि.२९/०७/२०२५, दि.०६/११/२०२५ व दि. ०९/०१/२०२६
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई यांचे दि. २६/१२/२०२५ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज या उपक्रमाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी दैनिक वृत्तपत्रामध्ये दि. १०/०८/२०२३ रोजी प्रसिध्द जाहिरातीची प्रलंबित रु. २,०७,०८८/- इतक्या रकमेची ७ देयके व दि. १६/०१/२०२५ रोजी आयोजित राष्ट्रीय स्टार्टअप दिवसाच्या प्रसिध्दीसाठी दि. १५/०१/२०२५ रोजी प्रसिध्द एका जाहिरातीचे रु. ४५,८६४/- इतक्या रक्कमेचे प्रलंबित देयक अदा करण्यासाठी मागणी क्र. झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन, (०१) महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (कार्यक्रम) लेखाशिर्ष २२३० ए३४३ या लेखाशिर्षाखालील (२६) जाहीरातीवरील खर्च या उद्दिष्टाखाली रु. २,५२,९५२/-इतका निधी उपलब्ध करून खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई यांनी संदर्भ क्र. (४) येथील पत्रान्वये केली आहे. त्याअनुषंगाने सन २०२५-२६ या वर्षात महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (कार्यक्रम) या योजनेंतर्गत मागणी क्रमांक झेडए-२, लेखाशिर्ष २२३० ए३४३ अंतर्गत २६-जाहीरातीवरील खर्च या उद्दिष्टाखाली निधी वितरीत करून खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीस महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (कार्यक्रम) या योजनेंतर्गत, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता मागणी क्र. झेडए-२, मुख्य लेखाशिर्ष २२३० कामगार व सेवायोजन, लेखाशिर्ष २२३० ए३४३ अंतर्गत २६- जाहीरातीवरील खर्च या उद्दिष्टाखाली खालीलप्रमाणे निधी उपलब्ध करून खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे .

(रुपये लाखात)

| मुख्य लेखाशिर्ष ( २२३० ए ३४३ ) | मुळ तरतुद | बीम्स वर उपलब्ध निधी | यापूर्वी वितरीत केलेला निधी | याद्वारे वितरीत करावयाचा निधी | एकूण वितरीत निधी |
|---|---|---|---|---|---|
| २६- जाहीरातील वरील खर्च आणि कार्यशाळा/ मार्गदर्शक कार्यक्रम | १०.०० | २.६० | ०.०० | २.५३ | २.५३ |
| **एकूण** | **१०.००** | **२.६०** | **०.००** | **२.५३** | **२.५३** |

४. महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज या उपक्रमाच्या प्रचार व प्रसिध्दीची दैनिक वृतपत्रामधील दि. १०.०८.२०२३ रोजीच्या जाहीरातीची रु. २,०७,०८८/- इतक्या रक्कमेची ७ देयके तसेच सोसायटीमार्फत दि. १५/०१/२०२५ रोजीच्या राष्ट्रीय स्टार्टअप दिवस कार्यक्रमाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठीच्या रत्नागिरी टाईम्स या वृत्तपत्राचे रु. ४५,८६४/-इतक्या रकमेचे देयक अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. सदर खर्च हा मागणी क्र. झेडए-२, २२३० कामगार व सेवायोजन, (०१) महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (कार्यक्रम) लेखाशिर्ष २२३० ए३४३ या लेखाशिर्षाखालील (२६) जाहीरातीवरील खर्च या उद्दिष्टाखालील सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता उपलब्ध असलेल्या तरतूदीतुन भागविण्यात यावा.

६. याकरिता आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांना नियंत्रण अधिकारी, सहायक संचालक, लेखा यांना “आहरण व संवितरण अधिकारी” तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांना “नोडल एजन्सी” म्हणून प्राधिकृत करण्यात आले आहे.

७. सदर निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांनी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांचेकडे वर्ग करुन याबाबतचे लेखे स्वतंत्रपणे अद्ययावत ठेवावेत. उपरोक्त निधी ज्या कारणास्तव उपलब्ध करुन देण्यात आला आहे त्याच कारणास्तव खर्च करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांची राहील. निधी खर्च करताना वित्त विभाग व नियोजन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना/अटी व शर्तीचे पालन करावे.

८.	सदरहू निर्णय हे वित्त विभागाने त्यांच्या अनौ. संदर्भ क्र.७४/२०२६,व्यय-६, दि.१९.०२.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरून तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग एक, नियम क्र. ४० अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

९.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०३१३१८४३४८७५०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANJUSHA AMIT KARANDE

Digitally signed by MANJUSHA AMIT KARANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=4B1C1C68B2FB7D60932C7A539658F299AF288EB5FBE81CEB2178B5DEEA6F7A28, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6BC8432DE7E7323854E5E7499C63951988287A093EF9B088F4B029753EA90109, cn=MANJUSHA AMIT KARANDE
Date: 2026.03.13 18:46:27 +05'30'

**( मंजुषा कारंडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई
२. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा परीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, मुंबई /ठाणे.
६. अपर कोषागार अधिकारी, उप कोषागार कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई.
७. कार्यासन अधिकारी (प्रशा-३) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती.